CNR No. MHGA090004292019
नियमित दिवाणी दावा क्र. ४०/२०१९
अरुण वगैरे -विरुध्द- बंडु
नि.क्र.२८ वर आदेश

## कोर्ट विद्यमान सह दिवाणी न्यायाधीश (क.स्तर), चामोर्शी यांचे न्यायालय

**नियमित दिवाणी दावा क्रमांक ४०/२०१९**

१. श्री. अरुण परशुराम काटवे,
वय अं.:- ३५ वर्षे, धंदा- शेती,

२. श्री. दिनेश परशुराम काटवे,
वय अं.:- ३१ वर्षे, धंदा- शेती,
दोघेही राहणार- कुनघाडा रै., तह.- चामोर्शी,
जिल्हा- गडचिरोली. ... **वादी**

**...विरुध्द...**

श्री बंडु उष्टु कोठारे
वय अं.:- ५० वर्षे, धंदा- शेती,
राहणार- कुनघाडा रै., तह.- चामोर्शी,
जिल्हा -गडचिरोली. ... **प्रतिवादी**

---

वादींतर्फे वकील श्री. व्ही.जी. चिळंगे
प्रतिवादीतर्फे वकील श्री. आर.बी. कुनघाडकर/श्री.एम.डी.सहारे

................................................................................................

### : निशाणी २८ वर आदेश पारीत :
### (दिनांक १५/०७/२०२२ रोजी)

१. वादीने प्रस्तुतचा अर्ज हा दिवाणी प्रक्रिया संहिता, १९०८ आदेश ६, नियम १७ प्रमाणे दावा दुरुस्तीकरीता दाखल केलेला आहे.

२. वादीचे असे कथन आहे की, वादीने प्रस्तुत दावा कायमच्या मनाई हुकूमाकरीता दाखल केला आहे. प्रतिवादीने यापुर्वी कैफियत दिली असून त्याने दावामिळकत वादीचे आजोबा बुधा काटवे यांच्याकडुन दिनांक २९.०४.१९९८

रोजी नोंदणीकृत खरेदीखताव्दारे विकत घेवुन कब्जा घेतला असल्याबाबत नमुद केले आहे. या न्यायालयाने वादीचा नि.क्र. ०५ चा अर्ज नामंजुर केला आहे. सदर आदेशाचा गैरफायदा घेवुन प्रतिवादीने वादीचा कब्जा बळजबरीने हिसकावुन घेतला. सबब त्याअनुषंगाने दाव्यातील मजकुरात व विनंतीमध्ये दुरूस्ती आवश्यक आहे. सदर दुरुस्तीमुळे दाव्याच्या स्वरुपात कोणताही बदल होणार नाही. सबब अर्ज मंजूर करण्यात यावा.

३. प्रतिवादीने म्हणणे दाखल करून जोरदार विरोध केला आणि कथन केले की, अर्ज मंजुर केल्यास खर्च बसविण्यात यावा. वादी व प्रतिवादीच्या कथनांचा विचार करता प्रस्तुत अर्जाच्या निर्णयाकामी खालील प्रश्‍ने उपस्थित होत असून त्यावर माझे निष्कर्ष कारणमीमांसेसह खालीलप्रमाणे आहेत.

| **अ.क्र** | **प्रश्‍ने** | **निष्कर्ष** |
|---|---|---|
| १. | नियोजित दुरुस्ती ही दाव्यातील वादाचे निराकरण करण्याकरीता आवश्यक आहे का ? | होकारार्थी |
| २. | नियोजित दुरुस्ती मंजुर होउन मिळण्यास वादी पात्र आहे का? | होकारार्थी |
| ३. | अंतिम आदेश काय? | अर्ज खर्चासह मंजूर करणेत आला. |

## <u>: का र ण मी मां सा :</u>

४. **<u>प्रश्‍ने क्र. १ ते ३ बाबत</u>** :- वादीचे अर्जातील कथन व प्रतिवादीचे म्हणणे आणि अभिलेखाचे अवलोकन केले. दोन्ही वकीलांचा युक्तिवाद ऐकला. अर्जाचे पुष्ठयर्थ प्रतिज्ञापत्र दाखल केलेले आहे.

५. प्रस्तुत दाव्याचे व प्रस्तावित दुरुस्तीचे स्वरुप पाहता कब्जाबाबतची नियोजित दुरूस्ती नंतर घडलेल्या घटनेबाबत मागितल्याचे स्पष्ट होते. तसेच नियोजित दुरुस्ती प्रतिवादीच्या खरेदीखताबाबत भाष्य करुन खरेदीखत रद्द करण्याचा विनंतीसाठी सुध्दा आहे. सदर खरेदीखताबाबत वादीला प्रतिवादीने

लेखी बयाण दाखल केल्यावर समजले असे युक्तीवादादरम्यान वादींच्या वकीलांनी म्हटले. सदर नियोजित दुरुस्तीने दाव्यातील संपुर्ण वादाचे निराकरण होण्यास मदत होणार आहे. सबब सदर नियोजित दुरुस्ती आवश्यक असून वादी सदर दुरुस्ती मंजूर होउन मिळण्यास पात्र आहे. परंतु लेखी बयाण सन-२०१९ मध्ये दाखल झाल्यावर वादीने प्रस्तुत अर्ज सन-२०२१ मध्ये विलंबाने दाखल केला आहे. त्यामुळे वादीवर खर्च बसवुन अर्ज मंजुर करता येईल. सबब प्रश्ने क्र. १ व २ यांचे उत्तर होकारार्थी असे देण्यात येते. अर्ज खर्चासह मंजुर होण्यास पात्र आहे. म्हणून प्रश्न क्र. ३ च्या अनुषंगाने खालीलप्रमाणे आदेश पारीत करण्यात येतो.

**: आ दे श :**

१) प्रस्तुतचा अर्ज वादीने प्रतिवादीस रक्कम रुपये ४००/- खर्च देण्याच्या अटीवर मंजुर करणेत येत आहे.

२) वादीने दाव्यात नियोजित दुरुस्ती पुढील तारखेपर्यंत करून सुधारीत प्रत दाखल करावी.

३) अर्जाचा खर्च दाव्याच्या अंतिम खर्चामध्ये समाविष्ट करणेत यावा.

Digitally signed by CHANDRADIP PRAVINCHANDRA RAGHUVANSHI
Date: 2022.07.16 11:10:22 +0530

चामोर्शी.
दिनांक : १५.०७.२०२२.

(चं. प्र. रघुवंशी)
सह दिवाणी न्यायाधीश (क.स्तर),
चामोर्शी

***CERTIFICATE***

I affirm that the contents of this P.D.F. file are word to word same, as per original Judgment.

Name of Stenographer : Mr. M.R.Mohurle, Stenographer (Grade-3)
Name of Court : Jt. Civil Judge (Jr.Dn.) & JMFC, Chamorshi.
Date of Judgment : 15/07/2022.
Judgment checked and signed by Presiding Officer on : 15/07/2022.
**Judgment uploaded on : 16/07/2022.**